# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.२७/०७/२०१९

## <u>दि.२६/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३५४/१९,भादविक २७९,३३७,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | गोटीराम मगर, वय ४५ वर्षे,रा.चासकमान,खेड,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात पी.एम.टी.बसचालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०७/२०१९ रोजी रात्रौ ०९/१५ वा.चे सुमारास स्वारगेट एस.टी.स्टॅन्डचे बाहेर पुणे सातारा रोडवर स्वारगेट,पुणे |
| **तपशिल** | दि.१३/०७/२०१९ रोजी रात्रौ ०९/१५ वा.चे सुमारास स्वारगेट एस.टी.स्टॅन्डचे बाहेर ट्रॅफिक जाम झाल्याने तसेच दोन पी.एम.टी.बसचे मधून जाण्यासाठी वाट असल्याने तेथून रोड क्रॉस करीत असताना, फिर्यादी यांचे गावातील इसम नामे-धोंडीबा भिका जाधव, हे सर्वात शेवटी होते. व त्यांचे पुढे महिला नामे-देऊबाई प्रभाकर जाधव, या होत्या दोन्ही बसचे मधून बाहेर पडत असताना, पुढे असणारी पी.एम.टी.बस चालकाने हयगयीने कोणताही विचार न करता बस मागे घेतल्याने महिला देऊबाई जाधव यांना बसचा धक्का लागुन पुढे पडल्या व त्यांना मुक्का मार लागला तसेच इसम नामे- धोंडीबा भिका जाधव,वय ६५ वर्षे,रा.मु.मिरजेवाडी,पो. चासकमान,ता.खेड,जि.पुणे हे दोन्ही बसचे मध्ये अडकून खाली पडले.त्यांना तेथून उपचारकामी खेड येथील हॉस्पिटल येथे प्रथमोपचार कामी ॲडमिट केले. त्यानंतर धोंडीबा जाधव यांचा मुलगा-कैलास जाधव याने धोंडीबा जाधव, यांा पुढील उपचारकामी ससून हॉस्पिटल येथे ॲडमिट केले असता ते दि.२४/०७/२०१९ रोजी मयत झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.लाहोटे ८८८८०९००८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३५३/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | उमेश लोढे, वय ३० वर्षे,रा.पर्वतीदर्शन,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०७/२०१९ रोजी सकाळी ०५/३० वा.चे सुमारास आयडीया कंपनीचे स्टोअर्सच्या समोरील बाजुला, हॉटेल श्रध्दाजवळ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील एक मोबाईल १० हजार रू.किमतीचा जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५११/१९,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | जितेश गांधी, वय २८ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०७/२०१९ रोजी सकाळी ०९/१० वा.ते ११/०० वा.चे जैन अपार्टमेंट सुखसागर नगर, डॉल्फीन चौकापासुन जवळ,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील २७ हजार रु. रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण २ लाख १२ हजार रु. किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे २२०/१९,भादविक ४१८,४२०,३४,माहिती तंत्रज्ञान कायदा ६६(सी),६६(डी)

**फिर्यादी** एक इसम,वय ३० वर्षे, रा. नाना पेठ, पुणे

**आरोपी** तीन अज्ञात इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०५/२०१९ रोजी नाना पेठ, पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना अज्ञात व्यक्तीने कर्ज मिळवुन देतो असे खोटे सांगुन मेल आयडीचा वापर करुन, वेगवेगळ्या बँक अकाऊंटवर पैसे भरण्यास सांगुन तसेच मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांची एकुण ४४,२५०/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) व्हि.एस.साळुंखे ९८२३४१९९७०

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोथरुड पो स्टे २५६/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती तंत्रज्ञान कायदा ६६(सी),६६(डी)

**फिर्यादी** एक इसम,वय २४ वर्षे,रा.कोथरुड, पुणे

**आरोपी** अज्ञात

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०७/२०१९ रोजी ००/०० वा ते.दि.१०/०७/२०१९ रोजी ००/०० वा.चे दरम्यान व्हि/१५,ब्लॉक १५,कॉसमॉस कोऑपेरटिव्ह बॅक सोसायटी,राहुल टॉवर्सजवळ इंदिराशंकरनगरी पौड रोड, कोथरुड, पुणे

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,फिर्यादी हे घरी असताना त्यांना महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीमध्ये नोकरी लागली असल्याचे सांगुन विविध कारणे सांगुन,नमुद रक्कम ऑनलाईन भरण्यास भाग पाडुन मोबाईल धारक व कोटक महिंद्रा बॅक अकाउंट धारक यांनी त्यांची एकुण ८८,२००/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. .

**त.अंमलदार** पो.निरी. एस.एस.खटके ७५८८२३५८४४

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ६४५/१९,भादविक ४२०,४१९,माहिती तंत्रज्ञान कायदा ६६(सी),६६(डी)

**फिर्यादी** एक इसम,वय-४१ वर्षे,रा.कोंढवा खुर्द, पुणे

**आरोपी** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१७/११/२०१८ रोजी रात्री ०८.३० वा.चे सुमारास सुमारास फिर्यादी यांचे शंकर रुक्मीनी अपार्टमेंट शॉप नंबर ०४, कोंढवा बस स्टॉप, माधव गेस्ट हाऊस समोर, रॉयल एन्टरप्राईजेस दुकानामध्ये,पुणे

**तपशिल** वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी यांचे मनी ट्रान्सफरचा व्यवसाय असुन त्याकरीता इको नावाचे सॉफ्टवेअर हे सन २०१७ मध्ये इको इंडिया फायनॅन्शियल सर्व्हीसेस प्रा लि, दिल्ली या कंपनीकडुन फिर्यादी यांनी त्यांचे दुकानातील संगणकावर टाकुन घेतले होते त्याकरीता फिर्यादी हे त्याचा ईमेल आय.डी व पासवर्ड टाकुन वापरत होता व त्यांचा मोबाईल नंबर हा नमुद सॉफ्टवेअर कंपनीला रजिस्टर केलेला होता.सदर मनी ट्रान्सफर सॉफ्टवेअर मध्ये फिर्यादी कंपनीच्या आय.सी.आय.सी.आय बॅंक, दिल्ली शाखा चे खाते मध्ये पैसे रोज भरत होते. दि.१७/११/२०१८ रोजी रात्री ०८/०० वा.पर्यंत फिर्यादी यांचे अकाऊंटमध्ये एकुण ९,५३,५८०/- रुपये शिल्लक होते. त्यांनतर ०८/३० वा.चे सुमारास फिर्यादी यांना मनी ट्रान्सफरचे सॉफ्टवेअर इकोमध्ये एक रिपोर्ट आला की, फिर्यादीच्या वर नमुद खात्यातुन एकुण रुपये ७,५२,६००/- रु. ट्रान्सफर झालेले आहेत फिर्यादी यांना कस्टमर केअरशी संपर्क साधुन अकाऊंट ब्लॉक केले, त्यामुळे फिर्यादी यांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे मनी ट्रान्सफर सॉफ्टवेअर इको याचा आय.डी व पासवर्ड हॅक करुन व ॲपमधील ग्राहकांची माहीती हॅक करुन ग्राहकांचे माहीतीचा वापर करुन फिर्यादीच्या खात्यातील एकुण ७,५२,६००/- रुपये रक्कम विविध अनोळखी खात्यावर भरली व ती काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी. (गुन्हे) एम.एस.कुंभार ८१०८००५५३७

## दि.२७/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २३०/१९,भादविक ४६१ |
| **फिर्यादी** | राजेंद्र बिबवे, वय ५४ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०७/२०१९ रोजी रात्रौ ०९/३० वा.ते दि.२७/०७/२०१९ रोजी सकाळी ०६/०० वा.चे दरम्यान बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, बिबवेवाडी गावठाण पुणे येथील विठ्ठल रुक्मणी मारुती मंदिरामध्ये कोणीतरी अज्ञात चोरटयाने मंदिरातील कुलूप लावुन बंद असलेली दान पेटीचा दरवाजा कशाचेतरी सहायाने तोडून त्यातील अंदाजे ५ हजार रु. रक्कम चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. व्ही.ए.शेवाळे |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**